562

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

S.P.P.U., P.R.O.
15 MAR 2023
Inward No. 64

वनस्पतीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे –४११ ००७
दूरध्वनी : (०२०) २५६०१४३९, २५६०१४३८

संदर्भ क्र. : वनस्पतीशास्त्र / ६६४/२३

दिनांक : १५/०३/२०२३

प्रसिध्द्रीसाठी

**वनस्पती विज्ञानाच्या माध्यमातून उदयोन्मुख संशोधन व औषधी वनस्पती-विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे वनस्पतिशास्त्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे उद्घाटन.**

वनस्पतिशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे दिनांक १४ - १५ मार्च, २०२३ रोजी वनस्पति- विज्ञानाच्या माध्यमातून उदयोन्मुख संशोधन व औषधी वनस्पती विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मा. संजीव सोनवणे प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या अध्यक्षते खाली व प्रा. तनुजा मनोज नेसरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय भारत सरकार व प्रा. ए. के. शासने, संचालक राष्ट्रीय वनस्पती संशोधन संस्था, लखनऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. उद्घाटनावेळी प्रा. स्मिता झिंजार्डे, संचालक, स्कुल ऑफ लाईफ सायन्सेस, प्रा. ए. बी. नदाफ, वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. अविनाश कांबळे, परिषद समन्वयक, डॉ. शिर्षा मित्रा, परिषद सचिव यांनी परिषदेच्या उद्देशाविषयी माहिती दिली. प्रा. नदाफ यांनी विभागातील संशोधनात्मक चाललेल्या कार्याविषयी माहिती उपस्थितांना दिली. परिषद राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या माध्यमातून व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ पुरस्कृत पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्राच्या सहयोगाने वनस्पतिशास्त्र विभागाने आयोजित केली आहेत.

मा. प्र-कुलगुरू प्रा. संजीव सोनावणे यांनी सर्वसामान्यांना त्यांच्या परीसरातील असलेल्या वनस्पतींच्या माध्यमातून आरोग्य आणि शाश्वत विकास व रोजगार निर्मिती साध्य करता येईल असे म्हटले सर्वांनी वनस्पती विषयी माहिती जाणून त्यांचे संवर्धन, लागवड, शाश्वत उपयुक्तता याविषयी जागरूकता निर्माण करावी. वनस्पतीच्या माध्यमातून रोजगार निर्मिती बाबतही त्यांनी तरूण संशोधकांनी नाविण्यपुर्ण प्रकल्पाची निर्मिती करावी असे आवाहन केले.

प्रा.ए.के. शासने यांना वनस्पतीतील विविधता, रासायनिक घटकांच्या माध्यमातुन आरोग्य व अन्नसुरक्षा समस्या विषयी मार्गदर्शन केले. प्रा. तनुजा नेसरी यांनी औषधी वनस्पतीतील व्यापार, वाढती मागणी, राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाचे कार्य, औषधी वनस्पतीतील संधी व आव्हाने याविषयी संशोधक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमावेळी वनस्पतिशास्त्र विभागातील माजी प्राध्यापक डॉ. जी. सी. चिंचणीकर, डॉ. व्यंकट गुणाले, डॉ. रत्नाकर ठेंगणे, डॉ. डी. आर. शिर्के, डॉ. के. एन. धुमाळ, प्रा. डॉ. टी. डी. निकम, पुणे,यांचा मा. प्र-कुलगुरू यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

२/-

राष्ट्रीय परिषदे दरम्यान प्रा. एम. झेड. आबदीन, नवी दिल्ली, प्रा. एस. आर. यादव, कोल्हापूर, वैदय गिरीष टिल्लू, पुणे, डॉ. अभिजीत काटे, अहमदाबाद, डॉ. रूपम कपूर, दिल्ली, डॉ. राजेश टंडन, दिल्ली, इतर वनस्पती विषयातील नवीन संशोधन, संशोधनातील संधी याविषयी दोन दिवस मार्गदर्शन करतील. राष्ट्रीय परिषदेसाठी सुमारे १०० च्यावर संशोधक यांनी नोंदणी केली आहे. विभागातील विद्यार्थी, पी.एच.डी. स्कॉलर यांनीही परिषदेत भाग घेतला आहे. परिषदेच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आर.सी.एफ.सी. कर्मचारी यांनी परीश्रम घेतले. सुत्र संचालन डॉ. हेमलता कोतकर यांनी केले व परिषदेचे सह समन्वयक प्रा. डॉ. दिगंबर मोकाट यांनी आभार मानले.